Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| Seat No. | |
|---|---|

# [5502]-EXT-1

**M.A. (Part I) EXAMINATION, 2019**

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका-1**

**(व्यावहारिक व उपयोजित मराठी : भाग-1)**

**(2013 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. साहित्यसंस्थांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या साहित्यसंमेलनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा उत्तरपत्रिकेत जसाचातसा लिहून त्याचे खुणांच्या सहाय्याने मुद्रितशोधन करा :

प्रामुखाने तरून विद्यार्थांना भेटण्याभागे माझा उद्देश कोणता ? या प्रश्नाच उत्तर शोध ण्यासाठी मी माझ्या विद्यार्थी दशेतले दीवस आठऊ लागलो. रामेश्वरच्या बेटापासुन सूरू झालेला तो प्रवास कीती विल्कक्षण होता त्या सगळ्या गोष्टी आठवल्या म्हणजे अर्तक्य आणि अ शक्य वाटायला लागतात. पण ते सगळं कशामूळे घडु शकलं ? कठोर परि-श्रमामुळे की महात्वाकांक्षेमुळे ? आनेक गोष्टी नी माज्या मनात फेर धरला. माझ्रा दुष्टीने त्या मागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे माझे योगदान कीती हे पाहुनच मि माजी योग्यता ठरवली. विकसीत देशाचे नागरीक व्हायाला आपण पात्र आहोत असा विश्वासच मुळात विद्यार्थी आणि तरणांच्या ठाई निरमान व्हायला हाव.

P.T.O.

munotes.in

2. ‘वृक्षमित्र’ समितीच्या अध्यक्षांची मुलाखत आकाशवाणीसाठी घ्या.

**किंवा**

पत्रलेखनाचे स्वरूप विविध प्रकार कोणते ते लिहा.

3. भाषांतराची आवश्यकता सांगून प्रकार कोणते ते स्पष्ट करा.

**किंवा**

निवेदनाचे स्वरूप स्पष्ट करून कार्यक्रमानुसार निवेदनाची शैली कशी बदलते ते लिहा.

4. जनसंपर्क कौशल्याची तंत्रे सांगून जनसंपर्काचे महत्त्व व आवश्यकता विशद करा.

**किंवा**

प्रकाशनसंस्थेचे कामकाज कसे चालते, याविषयावर प्रकल्पलेखनाचा नमुना तयार करा.

5. टिपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) मुद्रितशोधनाची आवश्यकता

(ब) प्रशासनिक परिभाषा

(क) कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

(ड) अनुवाद-भावानुवाद.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5502]-EXT-2

## M.A. (Part I) EXAMINATION, 2019

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका-2**

**(मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास — प्रारंभ ते 1818)**

**(2013 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. मराठी भाषेच्या उगम व विकासाची वाटचाल लिहा.

**किंवा**

"महानुभाव संप्रदायाने मराठी गद्य वाङ्मयाची मुहुर्तमेढ रोवली" या विधानाचा परामर्श घ्या.

2. संत काव्यनिर्मितीमागील प्रेरणा सांगून संत नामदेवांच्या वाङ्मयीन कार्याचा आढावा घ्या.

**किंवा**

संत एकनाथांच्या लेखनामागील वैविध्य व लोकशिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

3. शिवकालीन कालखंडातील संत तुकाराम व संत रामदास यांच्या काव्यातील समाजप्रबोधनपर विचार स्पष्ट करा.

**किंवा**

पंडित परंपरेतील कवींच्या काव्यलेखनाचा आढावा घ्या.

4. बखर वाङ्मयाचे वेगळेपण उदाहरणासह स्पष्ट करा.

**किंवा**

लावणी व पोवाड्याच्या आधारे शाहिरी वाङ्मयाचा परिचय करून द्या.

5. टिपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) मराठी शिलालेख व ताम्रपट

(ब) महदंबेचे धवळे

(क) तुका झालासे कळस

(ड) शाहिर होनाजी बाळा.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

| **Seat No.** | |
|---|---|

# [5502]-EXT-3

## M.A. (Part I) EXAMINATION, 2019

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-3**

**भाषाविज्ञान : वर्णनात्मक व सामाजिक**

**(2013 PATTERN)**

munotes.in

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषेचे स्वरूप व कार्य स्पष्ट करून उच्चारण आणि लेखन यांतील सहसंबंध विशद करा.

**किंवा**

खंडयुक्त स्वनिम व खंडाधिष्ठित स्वनिम यांचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** रूपिका, रूपिम, रूपिकांतर या संकल्पना स्पष्ट करून रूपिकांचे प्रकार विशद करा.

**किंवा**

'अर्थविन्यास' ही संकल्पना स्पष्ट करून अर्थाचे प्रकार विशद करा.

**3.** सामाजिक भाषाविज्ञानाची संकल्पना व पार्श्वभूमी स्पष्ट करा.

**किंवा**

विविध व्यवसाय क्षेत्रातील भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

4. भाषेचा सामाजिक परंपरा व सामाजिक संस्था यांच्याशी असणारा सहसंबंध विशद करा.

**किंवा**

भाषांच्या निर्मितीच्या संदर्भात पिजिन (Pidgin) व क्रिऑल (Creol) या संकल्पनांचा परामर्श घ्या.

5. टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) बोली भूगोल

(ब) आघात व सुरावली

(क) परभाषा संपर्क

(ड) स्त्रियांची भाषा.

munotes.in

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| Seat No. | |
|---|---|

# [5502]-EXT-4

## M.A. (Part I) EXAMINATION, 2019

## (For External)

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)

## (2013 PATTERN)

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** अभ्यासपत्रिका सोडवावी.

(*i*) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य

**किंवा**

(*ii*) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1960)

**किंवा**

(*iii*) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतरमीमांसा

**किंवा**

(*iv*) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

**किंवा**

(*v*) अलंकार, छंद आणि व्याकरण

munotes.in

## (*i*) ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'ग्रामीण' साहित्य ही संकल्पना स्पष्ट करून ग्रामीण साहित्यातून सामाजिक व सांस्कृतिक दर्शन कसे घडते, ते लिहा.

**2.** ग्रामीण साहित्यातून प्रकट होणाऱ्या ग्रामीण बोलीचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्याचे वाङ्मयीन योगदान स्पष्ट करा.

**3.** 'दलित साहित्य' ही संकल्पना स्पष्ट करून दलित साहित्याच्या विविध प्रेरणा स्पष्ट करा.

**किंवा**

दलित साहित्यातून प्रकट होणाऱ्या वेदना, विद्रोह, नकार यांचे स्वरूप स्पष्ट करा.

**4.** दलित रंगभूमीची वाटचाल स्पष्ट करा.

**किंवा**

दलित चळवळ व दलित साहित्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) ग्रामीण साहित्याचे देशीपण

(ब) कथाकार–आसाराम लोमटे

(क) दलित साहित्याची सामाजिक बांधिलकी

(ड) 'आठवणींचे पक्षी'.

munotes.in

*किंवा*

**(*ii*) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1960)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी' ही संकल्पना स्पष्ट करून सांस्कृतिक पार्श्वभूमीचे घटक स्पष्ट करा.

**किंवा**

मध्ययुगीन मराठी संत साहित्याची फलश्रुती स्पष्ट करा.

**2.** शिवकालीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'मराठी वाङ्मयामध्ये सामाजिक व धार्मिक जीवनाचे प्रतिबिंब पहावयास मिळते' या विधानाचा परामर्श घ्या.

**3.** महाराष्ट्र धर्म व समाजसुधारणाविषयक चळवळी यांचा मराठी साहित्याशी असलेला अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

अव्वल इंग्रजी कालखंडातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

munotes.in

**4.** 1818 ते 1960 या कालखंडातील मराठी साहित्यनिर्मितीमागील प्रयोजने लिहा.

**किंवा**

राजकीय विचारसरणीतून उदयाला आलेल्या साहित्याचा मागोवा घ्या.

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) महानुभाव पंथ

(ब) लावणी व पोवाडा

(क) मराठीतील भाषांतरित साहित्य

(ड) महात्मा फुले – वाङ्मयीन कार्य.

munotes.in

*किंवा*

**(*iii*) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतरमीमांसा**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** तौलनिक साहित्य ही संकल्पना स्पष्ट करून तौलनिक साहित्यभ्यासाची आवश्यकता विशद करा.

**किंवा**

वाङ्‌मयीन प्रभावाची तौलनिक साहित्याभ्यासातील उपयुक्तता स्पष्ट करा.

munotes.in

**2.** विश्व साहित्याचे वैश्विक निकष सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

'कृष्णाकाठ' व 'अंतस्थ' या दोन साहित्यकृतीतील राजकीय घटनांचा तुलनात्मक अभ्यास करा.

**3.** भाषांतर म्हणजे काय ते सांगून भाषांतर प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

अभिजात साहित्यकृतीतील अभिजातपण स्पष्ट करा.

**4.** प्रादेशिक, सांस्कृतिक व भौगोलिक अनुषंगाने भाषांतराच्या मर्यादा स्पष्ट करा.

**किंवा**

'घाशीराम कोतवाल' व 'हयवदन' या नाटकांच्या नाट्यसंहितांची तुलना करा.

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) तौलनिक साहित्याभ्यासाची तत्त्वे

(ब) साहित्यकृतींवरील प्रभाव

(क) अभिजात साहित्याचे भाषांतर

(ड) हयवदन नाटकातील संवाद.

munotes.in

*किंवा*

**(*iv*) वाङ्मयेतिहास लेखनविद्या**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वाङ्मयेतिहासाची संकल्पना स्पष्ट करून इतिहास व वाङ्मयेतिहास यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेसंदर्भात भारतीय संकल्पनाविचार स्पष्ट करा.

**2.** लेखनरिती वाङ्मयेतिहासकारासमोरील उद्दिष्टांनुसार पडणारे प्रकार स्पष्ट करा.

**किंवा**

वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन व कालपटाची आवश्यकता स्पष्ट करा.

**3.** आधुनिक मराठी वाङ्मयेतिहास लेखनातील समस्या व अडचणी स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी वाङ्मयेतिहासाच्या लेखनाचा इतिहास सोदाहरण स्पष्ट करा.

**4.** मराठीतील निवडक वाङ्मयेतिहासकारांचे कार्य स्पष्ट करा.

**किंवा**

मराठीतील वाङ्मयेतिहास विचारांची वाटचाल विशद करा.

munotes.in

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) भारतक्षेत्रीय अभ्यास व इतिहास

(ब) बृहद् वाङ्मयेतिहासलेखन

(क) शं.गो. तुळपुळे यांचे वाङ्मयेतिहास लेखन

(ड) वाङ्मयाचा भूगोल.

munotes.in

*किंवा*

**(*v*) अलंकार, छंद आणि व्याकरण**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अलंकार म्हणजे काय ते सांगून अलंकारांचे महत्त्व विशद करा.

**किंवा**

'छंद' संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

**2.** अलंकार व छंदाची संस्कृतमधील पूर्वपीठिका स्पष्ट करा.

**किंवा**

अलंकाराचे काव्यरचनेतील स्थान व सौंदर्यवृद्धी विशद करा.

**3.** व्याकरणाचे भाषेतील महत्त्व विशद करा.

**किंवा**

व्याकरण व भाषा यामधील परस्परसंबंध विशद करा.

**4.** व्याकरणाचे विविध प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

व्याकरणाची आवश्यकता स्पष्ट करा.

munotes.in

**5.** टीपा लिहा (कोणत्याही **दोन**) :

(अ) अलंकार व प्रतिमा

(ब) व्याकरण व प्रमाणभाषा

(क) मराठीतील वर्ण

(ड) व्याकरणाची पूर्वपीठिका.

munotes.in

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Page—**1**

| Seat No. | |
|---|---|

# [5502]-EXT-5

**M.A. (Part II) EXAMINATION, 2019**

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र.-5**

**(प्रसार-माध्यमे आणि साहित्यव्यवहार)**

**(2013 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. विकास पत्रकारितेचे प्रयोजन आणि व्याप्ती स्पष्ट करा.

**किंवा**

विविध कलांचे परस्पर संबंध विशद करा.

2. 'व्यक्तिवेध' या लेखनप्रकाराचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

श्राव्य माध्यमातील लेखन-प्रकारांचा परिचय करून द्या.

3. प्रासंगिक कार्यक्रमांच्या वृत्तसंकलनातील बारकावे स्पष्ट करा.

**किंवा**

मुद्रित माध्यमांसाठी केल्या जाणाऱ्या जाहिरात लेखनाचे विशेष स्पष्ट करा.

4. पटकथा लेखनाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

रूपांतर कौशल्याचे उदाहरणासह विवेचन करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) फीचर रायटिंग

(ब) लेखक परिचय

(क) वृत्तमालिका

(ड) वृत्तसंस्कृती.

Total No. of Questions—5] [Total No. of Printed Pages—2

| Seat No. | |
|---|---|

# [5502]-EXT-6

**M.A. (Part II) EXAMINATION, 2019**

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका-6**

**(साहित्य : समीक्षा आणि संशोधन)**

**(2013 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. समीक्षेची उद्दिष्टे आणि प्रयोजन थोडक्यात विशद करा.

**किंवा**

आदर्श समीक्षकाची साधना आणि समीक्षकाने पाळावयाची पथ्ये स्पष्ट करा.

2. समीक्षेच्या विविध पद्धती सांगून आस्वादात्मक समीक्षा पद्धतीचा परिचय करून द्या.

**किंवा**

इ.स. 1874 ते इ.स. 1920 या कालखंडातील समीक्षेचा परामर्श घ्या.

3. साहित्याच्या संशोधनात पुस्तके, नियतकालिके, वृत्तपत्रे आणि इतर साधनांचे महत्त्व स्पष्ट करा.

**किंवा**

लोकसाहित्य विषयक संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

4. आंतर्विद्याशाखीय संशोधन म्हणजे काय ? ते सांगून साहित्य आणि मानसशास्त्रातील अनुबंध स्पष्ट करा.

**किंवा**

भाषाविषयक संशोधनाचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) समीक्षेतील आस्वादाचे स्वरूप

(ब) चरित्रात्मक समीक्षा

(क) संशोधनाची साधने

(ड) मध्ययुगीन वाङ्मयाचे संशोधन.

munotes.in

Total No. of Questions—**5+5**]  [Total No. of Printed Pages—**3**

| Seat No. | |
|---|---|

# [5502]-EXT-7

**M.A. (Part II) EXAMINATION, 2019**

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 7**

**विशेष लेखकाचा अभ्यास (मध्ययुगीन/अर्वाचीन)**

**मध्ययुगीन : संत जनाबाई**

**(2013 PATTERN)**

**वेळ : तीन तास**  **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

munotes.in

1. वारकरी संत परंपरेतील सोयराबाई व मुक्ताबाई यांच्या अभंग रचनेची चर्चा करा.

**किंवा**

संत जनाबाईंच्या आध्यात्मिक विकासाला गुरुपरंपरेची जोड कशी मिळाली ते स्पष्ट करा.

2. संत जनाबाईंच्या आख्यानपर अभंग रचनांचा थोडक्यात आढावा घ्या.

**किंवा**

संत जनाबाईंच्या आत्मपर अभंगांचे स्वरूप ससंदर्भ स्पष्ट करा.

3. संत जनाबाईंच्या अभंगांतून विठ्ठलाविषयीचे प्रेम कसे व्यक्त झाले आहे ? ते लिहा.

**किंवा**

संत जनाबाईंच्या जीवनातील संत नामदेवांचे स्थान विशद करा.

4. संत जनाबाईंच्या कोणत्या अभंगांतून जीवननिष्ठा व्यक्त झाली आहे ? ते लिहा.

**किंवा**

संत जनाबाईंच्या अभंगांतील आलंकारिकता सोदाहरण विशद करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) मध्ययुगीन कालखंडातील सांस्कृतिक पर्यावरण

(ब) संत जनाबाईंचे - हरिश्चंद्राख्यान

(क) संत जनाबाईंच्या अभंगातील विठ्ठल माहात्म्य

(ड) संत जनाबाईंच्या अभंगांची भाषाशैली.

munotes.in

# [5502]-EXT-7

## अर्वाचीन—यशवंतराव चव्हाण

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनचरित्रातील राजकीय घटनांचा मागोवा घ्या.

**किंवा**

'कृष्णाकाठ' या आत्मचरित्राच्या आधारे यशवंतराव चव्हाण यांची जडणघडण लिहा.

**2.** यशवंतराव चव्हाण यांच्या पत्रसंग्रहातून प्रकट होणाऱ्या वैचारिकतेचा परिचय करून द्या.

**किंवा**

यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणांतून अभिव्यक्त होणारी वैचारिक भूमिका स्पष्ट करा.

**3.** यशवंतराव चव्हाण यांचे पुरोगामी महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

यशवंतराव चव्हाण यांचे भाषाविषयक विचार स्पष्ट करा.

**4.** यशवंतराव चव्हाण यांचे सामाजिक क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(अ) वेणूताई : यशवंतरावांच्या आदर्श पत्नी

(ब) साहित्यप्रेमी यशवंतराव

(क) यशवंतराव चव्हाण यांची लेखनशैली

(ड) यशवंतराव चव्हाण यांचे शैक्षणिक योगदान.

munotes.in

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**10**

| Seat No. | |
|---|---|

# [5502]-EXT-8

## M.A. (Part II) EXAMINATION, 2019

**(For External)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)**

**(2013 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** अभ्यासपत्रिका सोडवावी.

(1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

**किंवा**

(2) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(3) लेखनविद्या व निबंधलेखन

**किंवा**

(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

munotes.in

### (1) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'लोकसाहित्या'ची स्वरूपचिकित्सा करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अभ्यासाचे प्रयोजन स्पष्ट करा.

**2.** लोकसाहित्यावरील धर्माचा प्रभाव विशद करा.

**किंवा**

लोकसाहित्य आणि महाकाव्य यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

**3.** मराठी लोकसाहित्यातील विविध प्रकारांचा परिचय करून द्या.

**किंवा**

मराठी लोकगीतांमधील आशय उलगडून दाखवा.

**4.** मराठी लोकसाहित्यातील लोककलाकारांचा परिचय करून द्या.

**किंवा**

'तमाशा' या कलाप्रकाराचे स्वरूप व वैशिष्ट्ये लिहा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लोकसाहित्याचे अभ्यासक

(ब) लोकसाहित्याचे सादरीकरण

(क) पोवाडा

(ड) वासुदेव : एक लोककलाकार.

munotes.in

*किंवा*

**(2) सौंदर्यशास्त्र**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** सौंदर्यशास्त्राचे स्वरूप थोडक्यात विशद करा.

**किंवा**

सौंदर्यवाचक विधानातील तार्किकता स्पष्ट करा.

munotes.in

**2.** 'सुखवादा'च्या सिद्धांतासंदर्भात झालेल्या चर्चेचा परामर्श घ्या.

**किंवा**

सौंदर्यानुभवाची स्वायत्तता विशद करा.

**3.** सौंदर्यभावनेच्या स्वरूपाची चर्चा करा.

**किंवा**

कलाकृतीच्या 'रूपा'च्या मीमांसेचा मागोवा घ्या.

**4.** कलेच्या विविध परिणामांचा परिचय करून द्या.

**किंवा**

सौंदर्यशास्त्राच्या अभ्यास समीक्षेसाठी कसा फलदायी ठरतो ? चर्चा करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) सौंदर्यशास्त्र आणि नवे शोध

(ब) सह-अनुभूतीचा सिद्धांत

(क) मानवी मनातील एक भावना : सौंदर्यभावना

(ड) परिणामकारक संदेशन.

munotes.in

*किंवा*

**(3) लेखनविद्या व निबंधलेखन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मानवी समाजजीवनाच्या विकासातील भाषेचे योगदान स्पष्ट करा.

**किंवा**

संवादविषयक विविध सिद्धांतांचा परामर्श घ्या.

**2.** संवादप्रक्रियेतील भाषेचे महत्त्व विशद करा.

**किंवा**

साहित्यात संवादप्रक्रिया कशी कार्यरत असते ते विशद करा.

**3.** विविध क्षेत्रीय भाषाव्यवहाराचे स्वरूप उलगडून दाखवा.

**किंवा**

साहित्याची भाषा व प्रसारमाध्यमांची भाषा यातील साम्य-भेदाची चर्चा करा.

**4.** जनसंपर्काची संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

निबंधलेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

munotes.in

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संवादातील अडथळे

(ब) संवादातील अर्थाचे महत्त्व

(क) दूरचित्रवाणीची भाषा

(ड) संपादनाची कौशल्ये.

munotes.in

*किंवा*

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वैचारिक साहित्याचे वाङ्मयीन विशेष स्पष्ट करा.

**किंवा**

मराठी वैचारिक साहित्यामागील सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी स्पष्ट करा.

**2.** लोकहितवादींच्या शतपत्रातील आशयाचा मागोवा घ्या.

**किंवा**

वैचारिक साहित्याचे शैलीविशेष नमूद करा.

**3.** साहित्याच्या सामाजिक अभ्यासाची आवश्यकता विशद करा.

**किंवा**

लेखक आणि समाज यांचा अनुबंध स्पष्ट करा.

**4.** सामाजिकता व कलामूल्ये यातील संबंधाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याचा समाजावरील व समाजाचा साहित्यावरील परिणाम विशद करा.

munotes.in

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची 'निबंधमाला'

(ब) आचार्य जावडेकर यांचा 'आधुनिक भारत'

(क) आगरकरांचा सुधारणावाद

(ड) वाङ्मयीन अभिरुची.

munotes.in

*किंवा*

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 100**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्यसर्जन म्हणजे काय ? साहित्यसर्जनाच्या प्रेरणा विशद करा.

**किंवा**

साहित्यसर्जन विषयक विविध मतांचा परामर्श घ्या.

**2.** चरित्र आणि आत्मचरित्राची वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

साहित्य निर्मितीच्या मानसिक शक्ती कोणत्या ?

**3.** साहित्याच्या सर्जन प्रक्रियेवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा परामर्श घ्या.

**किंवा**

साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेवरील कालतत्त्वाचा प्रभाव विशद करा.

**4.** 'प्रसारमाध्यमांमुळे साहित्यसर्जनाला कशी प्रेरणा मिळते' ते स्पष्ट करा.

**किंवा**

ललित साहित्य आणि ललितेतर साहित्य यांच्या निर्मितीप्रक्रियेतील साम्य-भेदांची चर्चा करा.

munotes.in

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) साहित्यनिर्मिती व समकालीन परिस्थिती

(ब) नाटकाची भाषा

(क) आत्मचरित्रातील 'स्व'

(ड) मुद्रित माध्यमातील लेखन प्रकार.

munotes.in